**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020- 25657878 फॅक्स क्र. 020-25674641
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in संकेतस्थळ
www.puneruralpolice.gov.in

# टेंडर नोटीस

जा.क्र. नोंशा/प्रबंधक/ तज्ञ नेमणुकीबाबत/ २०२४ 5617 पुणे, दिनांक 2 /०९/२०२४.

**संदर्भ :- जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र. जिनसि/०/२०२४/AUG/AAO/०८६०४ दि. ३१/०८/२०२४**

**विषय :-** दोन ॲटीड्रोन खरेदी करणेकामी तज्ञ नेमणुक करणेबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पुणे ग्रामीण आस्थापनेवर कार्यरत दहशतवाद विरोधी शाखा, पुणे ग्रामीण याचे तांत्रिक सुसज्य होण्याच्या दृष्टीने, तसेच पुणे जिल्हयात अनाधिकृत ड्रोन चित्रीकरण निर्बध घालणेचे दृष्टीने ॲन्टीड्रोन गन खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांची रू. ५० लक्ष पर्यंत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तरी या आस्थापनेचेवतीने दोन नग ॲन्टीड्रोन गन खरेदी ही महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१६/ प्र.क्र. २१५/ उदयोग- ४ दिनांक २४/०८/२०१७ मधील अ.क्र. ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस GeM पोर्टलवर स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाव्दारे (Online bidding) व्दारे किंवा महाटेंडर या साईटवर ई टेंडरींग पध्दतीने करण्यात येणार आहे.

Gem पोर्टल वर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या निविदांच्या अनुषंगाने परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करून देणेकामी तज्ञाची नेमणुक करणेसाठी बंद लिफाफ्यात निवीदा मागविणे येत आहे.

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र. ८/उद्योग-४, दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये दरपत्रकाचे आधारे सदर सेवा उपलब्ध करून देणेचे अधीन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

तरी सदर दरपत्रके/ निविदा व स्विकृती उघडण्याची कार्यवाही ही तात्काळ असल्याने कालावधी हा पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| निविदा फॉर्म/ दरपत्रके सादर करणेची दिनांक | -- | दिनांक ०२/०९/२०२४ सकाळी १०.३० वा ते दिनांक ०६/०९/२०२४ दुपारी १२.०० वाजेपर्यत. |
| निविदा फॉर्म/ दरपत्रके स्विकृतीचा अंतिम दिनांक | -- | दिनांक ०६/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत |
| निविदा फॉर्म/ दरपत्रके उघण्याचा दिनांक | -- | दिनांक ०६/०९/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता (शक्य झाल्यास) |

तरी तांत्रिक दृष्टया पात्र असणा-या निविदाकार दरपत्रके बंद पाकिटात खरेदी समिती समक्ष सादर करणेची दक्षता घ्यावी.

**मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे मान्यतेने**

02/09/2024

( भागवत हिशोबे )
कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,
पुणे ग्रामीण.

प्रति, सर्व मेसर्स,

Scanned with OKEN Scanner

## -: परिशिष्ठ अ :-

Gem पोर्टल / ई टेंडर साईट वर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या निविदांच्या अनुषंगाने खालील दर्शविलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करून देणेकामी तज्ञाची नेमणुक करण्यात येणार आहे.

१) आस्थापनेचे वतीने दोन नग अॅन्टीड्रोन गन खरेदी ही महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१६/ प्र.क्र. २१५/ उदयोग- ४ दिनांक २४/०८/२०१७ मधील अ.क्र. ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस GeM पोर्टलवर स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाव्दारे (Online bidding) व्दारे करण्यात येणार आहे. किंवा महाटेंडर या साईटवर ई टेंडरींग पध्दतीने करण्यात येणार आहे.

३) नेमणुक करण्यात आलेल्या तज्ञ यांनी सदर अॅन्टीड्रोन गन खरेदी करणे आवश्यक असलेल्या निविदा प्रसिध्दी करणेपुर्व सदर अॅन्टीड्रोन गन करिता आवश्यक असलेले फिचर्स, तसेच सदर गनची उपयोगिता व वापर करणेकामी सुयोग्य अश्या तांत्रिक विश्लेषण बाबीची अहवालात्मक माहिती ही कार्यालयाचे प्रबंधक व खरेदी समिती यांना निविदा प्रसिध्दीकरिता उपलब्ध करून देणे.

४) वस्तु व सेवांची खरेदी योग्य दर्जा, विर्निदेश व पुरवठा तसेच किंमतीच्या वाजवीपणाची खातरजमा करणेकामी अहवाल प्रबंधक व खरेदी समिती यांना उपलब्ध करून देतील.

५) निविदा प्रकियेमध्ये सहभागी होणारे पुरवठादार यांचेकडून अॅन्टीड्रोन गनचा डेमो घेणे, वस्तु व गुणवता, हाताळणीकरिता योग्य तसेच वॉरंटी/ गॅरटी याबाबत खातरजमा करून सदर गन पुणे ग्रामीण दल या आस्थापनेकरिता घेणे अनुकूल व योग्य आहे असा अहवाल प्रबंधक व खरेदी समिती यांना उपलब्ध करून देणे.

६) निविदाव्दारे उपलब्ध होणारे L-१ पुरवठादार यांचेकडून जरी ते L-१ ठरले तरी ते पुरवठा करणारे अॅन्टीड्रोन गन ही सुस्थितीत व तांत्रिक विश्लेषणबाबीची पुर्तता करतात अगर कसे याबाबत अहवाल प्रबंधक व खरेदी समिती यांना उपलब्ध करून देतील.

७) तरी सदर अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसे प्रतिज्ञापत्र रू. १०० स्टॅम्प तज्ञ यांनी देणे बंधकारक आहे. तसेच पुरवठा आदेश प्राप्त झालेवर रूपये ५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे अनिवार्य राहील.

८) सदर अॅन्टीड्रोन गन खरेदीबाबत नेमण्यात येणारे तज्ञ यांनी पुर्व अनुभव तसेच अॅन्टीड्रोन गन विषयक कामाकाज खरेदी/ विक्री केल्याबाबतचे दाखला/ प्रमाणपत्र देणे अनिवार्य राहील. तसेच त्यांचे फर्म/ कंपनी/ संस्था ही जीएसटी / टिडीएस भरत असलेबाबत प्रमाणपत्र उपलब्ध करून देतील. तसेच सदर फर्म/ कंपनी/ संस्था शासकीय डि आर डि ए तसेच मेकिंग इंडिया तसेच उदयोग आधार/ शॉप अॅक्ट इ. मध्ये रजिस्टेशन असलेबाबत दाखला/ प्रमाणपत्र उपलब्ध करून देतील.

९) तरी तज्ञ नेमणुक करणे किंवा तज्ञ नेमणुक कुठल्याही क्षणी कारण न देता रदद करणेचे संपुर्ण अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना राहतील.

Scanned with OKEN Scanner